# डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शालेय शिक्षणात सुरु केलेले उपक्रम

**श्री. भोसले सचिन मच्छिंद्र**
*संशोधक*
*शिक्षणशास्त्र संकुल , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.*

**डॉ. बाविस्कर चंद्रकांत राघो**
*सहयोगी प्राध्यापक*
*शिक्षणशास्त्र संकुल , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ , नांदेड.*

***सारांश***

*शालेय शिक्षण हा विदयार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमधला महत्त्वाचा टप्पा आहे. डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी शालेय शिक्षण महत्त्वाचे मानले.शालेय शिक्षणात पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची सुविधा डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिली.प्रवरा परिसराबरोबरच शेजारील तालुक्यांमध्येही त्यांनी शालेय शिक्षण सुरु करुन विदयार्थी संख्या वाढविली.शाखा भेट , बाहय परीक्षा , सामाईक प्रवेश परीक्षा , केंद्रशासनपुरस्कृत अपंग एकात्म शिक्षण योजना , ई-लर्निंग सुविधा , सेवक प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश यासारखे विविध उपक्रम शालेय शिक्षणात राबवुन डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी संख्यात्मक व गुणात्मक वाढ केली.*

***शोध संज्ञा :-*** *शालेय शिक्षण , डॉ.बाळासाहेब विखे पाटील , शैक्षणिक उपक्रम , प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था , अपंग एकात्म शिक्षण योजना , सेवक प्रशिक्षण .*

## १ प्रस्तावना

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा कालखंड हा विदयार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.विदयार्थ्यांच्या शारीरिक ,मानसिक ,भावनिक विकास करण्याचे काम याच कालावधीत केले जाते.शालेय शिक्षण हा विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया समजला जातो.विदयार्थ्यांच्या बौध्दिक ,शारीरिक ,मानसिक वाढीबरोबरच जीवनमूल्य,राष्ट्रप्रेम अणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे कार्य शालेय शिक्षणाच्या माध्यमातून केले जाते.याच सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी राज्यातील अनेक शिक्षण संस्था समर्थपणे पेलत आहेत.

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शालेय शिक्षण ग्रामपंचायत क्षेत्रातील दुर्गम -अतिदुर्गम भागात नेण्याचे काम केले.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा आधार हा खेडयांचा विकास ,असंघटितांचा विकास,अल्पभूधारक शेतक-यांचा विकास ,शेतमजुरांचा विकास हा होता.राष्ट्राचा विकास म्हणजे खेडयांचा विकास या महात्मा गांधींच्या वचनावर त्यांची अढळ श्रध्दा होती.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शालेय शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन परिसरातील कुठलाही विदयार्थी विशेषत: विदयार्थ्यांनी शालेय शिक्षणापासून वंचित राहणार नाही यासाठी ते प्रयत्नशील होते.

१९८० च्या दशकात व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन इ.अकरावी व इ.बारावीच्या विदयार्थ्यांसाठी व्यावसायिक विषय सुरु करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला होता.त्यानुसार आपल्या परिसरातील विदयार्थ्यांना त्याचा जास्तीत जास्त फायदा घेता यावा आणि इच्छा व बौध्दिक कुवत असुनही केवळ येथे सोय नाही म्हणून संधी मिळाली नाही ,असे होऊ नये याकरिता उच्च माध्यमिक शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांच्या दृष्टीने जास्तीत जास्त

उपयोगी होतील असे व्यावसायिक विषय डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी सुरु करण्यास प्रयत्न केले.यातुन कनिष्ठ महाविदयालयात खालील व्यावसायिक विषय शिकवले जातात.

१.पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय

२.इलेक्ट्रिक मेंटेनन्स

३.स्कुटर व मोटारसायकल सर्व्हिसिंग

४.हॉर्टिकल्चर

५.इलेक्ट्रॉनिक्स

शालेय शिक्षणाच्या विस्तारात डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी लोकसहभाग फार महत्त्वाचा मानला.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचे असे मत होते की ,लोकांच्या वर्गणीतून शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या पाहिजेत.लाखो रुपये देण्या-यापेक्षा लाख हात महत्त्वाचे .यामुळे शैक्षणिक कार्य हे व्यापक स्वरुपाचे असावे संकुचित नको.यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शालेय शिक्षणात लोकसहभाग कसा वाढवावा याकरिता खालीलप्रमाणे प्रयत्न करण्यास सांगितले.

१. ज्यांना शक्य असेल त्यांच्याकडून शाळेस कायमस्वरुपी शेतीची जमीन मिळवावी.

२.शाळेतील वर्गाना ,मोठया हॉलला ,वसतिगृहाच्या खोल्यांना नाव देण्याच्या अटीवर देणगी मिळवावी.

३.शैक्षणिक मौलिक वस्तू व साहित्य देणगी मिळवावी.

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या मते या सर्व व्यवहारांचा केंद्रबिंदू सुसंस्कृत माणूस असल्याने तो बनवण्याच्या कार्यात प्रत्येकाचा सहभाग असावा.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या या कार्यामागचा शैक्षणिक विचार हा होता की,शिक्षणात लोक सहभाग वाढल्याने लोकांना शैक्षणिक संस्थांबददल आपलेपणाची भावना निर्माण होते.

२०१४-१५ या शैक्षणिक वर्षात प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शालेय शिक्षण विभागामध्ये प्राथमिक शिक्षण -१८४५ विदयार्थी,माध्यमिक शिक्षणात १२,३०९ विदयार्थी ,उच्च माध्यमिक शिक्षणात ५८५३ असे एकुण १९,९९७ विदयार्थी शिक्षण घेत आहेत.त्यामध्ये विदयार्थिनींचे प्रमाण ४७.४७ टक्के आहे.प्रवरा परिसराबरोबरच पारनेर,पाथर्डी,शेवगाव,राहुरी,कोपरगाव अशा विविध ठिकाणी शालेय शिक्षणाची सोय डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिली आहे.शालेय शिक्षणापासूनच विदयार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य व स्वयंरोजगाराचे शिक्षण मिळावे,म्हणून डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रयत्नशील होते.विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी खालील उल्लेखनिय उपक्रम सुरु केले.

**१.अप्रगत विदयार्थी सुधार प्रकल्प :-**

विदयार्थ्यांच्या प्रगतीची हेळसांड होणार नाही याची पुरेपुर काळजी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी घेतली.नैदानिक चाचण्यांमधून विदयार्थ्यांच्या आकलन क्षमतांचा अंदाज घेऊन उपचारात्मक अध्यापन पध्दतींची शास्त्रशुध्द पध्दतीने निवड केली जाते.दररोज किमान एक तास याप्रमाणे शाळेत कामकाजाच्या प्रत्येक दिवशी विदयार्थ्यांची विशेष अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पुरेशी काळजी घेतली जाते व त्यांना प्रगत विदयार्थ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.या उपक्रमाचे अत्यंत चांगले परिणाम दिसुन आलेले आहेत.अप्रगत म्हणून ओळखले जाणारे विदयार्थी इ.दहावी व

इ.बारावीच्या परीक्षा उत्तम गुण मिळवुन उत्तीर्ण झाल्याचे पहावयास मिळते आहे.हा उपक्रम बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ लागु होण्याच्या अगोरदपासून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत राबविला जात आहे.

**२. करियर गाईडन्स विभाग**

विदयार्थ्यांना आपला जीवनव्यवसाय विदयार्थीदशेतच निश्चित करता आल्यास त्या दृष्टीने आवश्यक ते अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांना नियोजन करता येणे शक्य आहे. तथापि पुरेशा मार्गदर्शनाच्या अभावी ते आपल्या ध्येयापासून दूर जाऊ नयेत वा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांची भूमिका संदिग्ध राहु नये यासाठी त्यांच्या अभिरूची - अभिवृत्ती चाचणीबरोबरच ते निवडू इच्छित असलेल्या अभ्यासक्रमाबाबत त्यांना अचूक इत्थ्यंभूत आणि विश्वसनिय माहिती उपलब्ध व्हावी म्हणून शाखानिहाय करियर गाईडन्स मेळावे आयोजित केले जातात.आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम ,त्यापुढील प्रगत अभ्यासक्रम अभ्यासक्रमाचा कालावधी,मुलाखतीचे तंत्र ,नोकरीच्या संधी इ.बाबत तज्ज्ञ व्याख्यात्यांची मार्गदर्शन पर व्याख्याने आयोजित केली जातात.माहिती तक्त्यांचे प्रदर्शन भरविले जाते.प्रदर्शन पाहण्यासाठी व व्याख्यानासाठी विदयार्थ्यांबरोबरच पालकही उपस्थित असतात.या उपक्रमामधून कमी-अधिक गुणवत्ता असणा-या विदयार्थ्यांना आपल्या आकलन क्षमता लक्षात घेऊन योग्य अभ्यासक्रमाची निवड करण्यास पुरेपुर वाव मिळतो.

**३.शाखा भेट**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणा-या सर्व शालेय शिक्षणाच्या शाखांमध्ये कामकाज योग्य कार्यक्षमतेने चालावे, त्या कामकाजात अत्याधुनिकता यावी ,महाराष्ट्र शासनाच्या व प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी ,शाळेच्या सर्व कामकाजात एकसूत्रता यावी,शाळेच्या अडचणी समजाव्यात यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शाखा भेटीचा उपक्रम सुरु केला. या तपासणी पथकामध्ये जेष्ठ मुख्याध्यापक,अनुभवी विषय शिक्षक ,प्रशासकीय व पर्यवेक्षकीय यंत्रणेमधील सहकारी यांचा समावेश असतो.

शाखा तपासणी हा एक भाग असला तरी शाळा विकासाच्या टप्प्यातील उणीवांचा शोध घेणे,उणीवांचा अभ्यास करुन त्या दूर करणे,भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तत्काळ निर्णय घेणे, शाळेच्या संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी प्रयत्न करणे या बाबींचाही समावेश य शाखा भेटीत होतो.या शाखा भेटीचा सकारात्मक परिणाम शाळांवर झालेला दिसुन येतो.

या उपक्रमामुळे शाळांची गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली.शाळेच्या कामकाजात सूसुत्रता येऊन संस्थेच्या ध्येय-धोरणांची अंमलबजावणी करणे सोयीचे झाले.इतर संस्थामध्ये केवळ शासनामार्फत शाळा तपासणी होते ,परंतु प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी संस्थेतील अनुभवी लोकांकडुन शाखा भेटीचा उपक्रम गुणवत्ता सुधारण्यासाठी केला.

**४. बाहय परीक्षा**

चार्लस डार्विनने उत्क्रांतीवादाचा सिध्दांत मांडताना The strongest are to survive असे म्हटले होते. डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनीही याच विचारातुन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा विदयार्थी आजच्या स्पर्धात्मक युगात टिकावा यासाठी विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यास प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत प्रोत्साहन दिले. या सर्व स्पर्धा

परीक्षांमधून विकासाच्या दिशेने आगेकुच करणारा सक्षम विदयार्थी घडविणे यासाठी दरवर्षी खालील स्पर्धा परीक्षांमध्ये प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे विदयार्थी सहभागी होतात.

१.जवाहर नवोदय विदयालय प्रवेश परीक्षा

२.पूर्व माध्यमिक , माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

३.शासकीय चित्रकला परीक्षा

४.राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा

५.गणित व विज्ञान मंडळाच्या परीक्षा

६.N.T.S.

७.N.M.M.S.

वरील परीक्षांसाठी शाळेत विदयार्थ्यांची नियोजनबध्द तयारी केली जाते.

**५.सामाईक प्रवेश परीक्षा मार्गदर्शन**

इ.१२ वी नंतर उच्च शिक्षणाच्या विविध व्यावसायिक कोर्सेससाठी प्रवेश परीक्षा अनिवार्य झालेल्या आहेत.खेडयांमध्ये या प्रवेश परीक्षेचे अतिरिक्त मार्गदर्शनाच्या कोणत्याही सोयी उपलब्ध नसतात. अशा परिस्थितीत विदयार्थ्यांना धीर आणि दिलासा देण्यासाठी या प्रवेश परीक्षांच्या विशेष मार्गदर्शनाची सुविधा डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या संकल्पनेतून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सर्व कनिष्ठ महाविदयालयात इ.बारावी विज्ञान शाखेतील विदयार्थ्यांना सामाईक प्रवेश परीक्षा मार्गदर्शन वर्ग वर्षभर चालविले जातात. दैनंदिन वेळापत्रकामध्ये यासाठी स्वतंत्र तासिका निश्चित केलेली असते.तसेच पुणे बोर्डाची एच.एस.सी. ची परीक्षा संपल्यानंतर पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविदयालयात तज्ज्ञ शिक्षकांकडुन विदयार्थ्यांची तयारी करुन घेतली जाते.क्रॅश कोर्सेस सुरु केले जातात. अशा उपक्रमांचे अत्यंत चांगले परिणाम समोर येत आहेत.सदर मार्गदर्शन वर्गासाठी प्रवरा परिसराबरोबरच मोठया संख्येने जिल्हयातील विदयार्थी-विदयार्थिनी प्रवेश घेतात.**२०१० -११** या शैक्षणिक वर्षात **१२७०** विदयार्थ्यांनी या मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेतला आहे. आजपर्यंत अनेक विदयार्थ्यांनी या प्रवेश परीक्षा मार्गदर्शनाचा लाभ घेतला असून या प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून विविध कोर्सेस साठी प्रवेश घेतला आहे.

**६.ई-लर्निंग सुविधा**

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या मते ,आपल्या विदयार्थ्यांना जगाबरोबर रहायच असेल तर आपण जगाच्या पुढे थोडंस राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे,तरच आपण जगाबरोबर राहु.यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी विविध विदयालयात ई-लर्निंगची सुविधा सुरु केली.प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या **१२ माध्यमिक विदयालयांमध्ये** गुरुजी टेक्नॉलॉजी,पुणे यांच्या सहकार्याने G-Klass सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.मराठी व सेमी इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांचा अभ्यासक्रम या शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या सहायाने शिकविला जातो.पारंपारिक अध्यापन पध्दतीपेक्षा नाविन्य असलेली ही अध्यापन पध्दती विदयार्थ्यांमध्ये कुतुहल व जिज्ञासा निर्माण करुन अभ्यासामधील त्यांचीग गोडी वाढविण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.तसेच **०८ शाखांमध्ये शासनपुरस्कृत आय.सी.टी. लॅब** कार्यरत असुन विदयार्थ्यांना स्वतंत्रपणे संगणक हाताळण्याचे व त्यातुन अध्ययन क्षमता विकसित करण्याचे कौशल्य प्राप्त होत आहे. शिक्षण

व्यवस्थेमधील प्रगत तंत्रज्ञानाचा वाढता वापर विदयार्थ्यांना सर्वांथाने सक्षम करत आहे.

**७.सेवक प्रशिक्षण**

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या मते , शिक्षकांनी आपले ज्ञान सतत अदययावत ठेवले पाहिजे.शिक्षणात येणा-या नवनवीन प्रवाहांची माहिती घेऊन त्याचे उपयोजन आपल्या अध्यापनात केले पाहिजे.यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून सेवक प्रशिक्षणाचा उपक्रम राबविला जातो.यात संस्थेतील प्राथमिक ,माध्यमिक शाखेतील सर्व विषय शिक्षकांची विषयज्ञान चाचणी घेण्यात येते.सुधारित अभ्यासक्रमांची शिक्षकांना माहिती व्हावी व त्यांच्या ज्ञानात भर पडावी तसेच विदयार्थ्यांना गतिमान जगात होणा-या बदलाची माहिती मिळुन ज्ञान वृध्दिंगत व्हावे त्यासाठी खालील प्रमाणे २०१०-११ साली शिक्षकांची विषयज्ञान चाचणी परीक्षा प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविदयालयात ,लोणी येथे घेण्यात आली.

| अन | वर्ष | प्रशिक्षणाचा विषय | सहभागी शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०१० | विषयज्ञान चाचणी व प्रशिक्षण | ५५६ |
| २ | २०१२ | विषयज्ञान चाचणी व प्रशिक्षण | ७० |
| ३ | २०१४ | कृतीसंशोधन | ८० |
| ४ | २०१५ | ज्ञानरचनावाद | १३० |

वरील चाचण्यांमध्ये ज्या शिक्षकांना कमी गुण मिळाले त्यांच्यासाठी कार्यशाळा घेऊन संबंधित विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले.

**८.स्पोकन इंग्लीश क्लासेस**

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी इंग्रजी शिक्षण व संभाषणाला विशेष महत्त्व दिले आहे.या हेतुने विदयार्थ्यांच्या संभाषण कौशल्यामध्ये सहजसुलभता यावी ,त्यांना इंग्रजी भाषा सफाईदारपणे बोलता यावी ,त्यांची लेखनशैली अधिकाधिक निर्दोष व परिणामकारक व्हावी या उददेशाने प्रत्येक विदयालयामध्ये स्पोकन इंग्लीश क्लासेस सुरु करण्यात आलेले आहेत.आठवडयातून दोन दिवस परिपाठाचे सादरीकरण इंग्लीशमधून होते.संबंधित शाखेतील इंग्लिश विषयाचे शिक्षक या उपक्रमासाठी अधिक वेळ देऊन विदयार्थ्यांची तयारी करुन घेतात.

**९.केंद्रशासनपुरस्कृत अपंग एकात्म शिक्षण योजना**

अंध- कर्णबधीर -अस्थिव्यंग विदयार्थ्यांना सामान्य शाळेतच विशेष शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इ.पहिली ते इ.बारावी पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन त्यांना सामान्य विदयार्थ्यांप्रमाणे शैक्षणिकदृष्टया सक्षम करणे या हेतुने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील विदयालय ,बाभळेश्वर येथे १९९७ पासून अंध युनिट व जून २००१ पासून कर्णबधीर युनिट डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी सुरु केले आहे.या युनिटमधील विदयार्थ्यांना शिक्षण व निवासाची सुविधा प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने मोफत केली असुन श्री.साईबाबा संस्थान ,शिर्डी यांच्याकडुन दोन वेळच्या जेवणाची मोफत सोय करण्यात आली आहे.

या युनिटच्या विदयार्थ्यांमधील सुप्त कलागुणांचा झालेला विकास अधिक वृध्दिंगत व्हावा म्हणून विशेष करुन या विदयार्थ्यांसाठी होणा-या विविध स्पर्धांमध्ये त्यांना सहभागी करण्यात येते.दि.१९ डिसेंबर २०१० मध्ये दै.सकाळ मार्फत

झालेल्या बालचित्रकला स्पर्धेत विदयार्थ्यांनी,खालीलप्रमाणे यश संपादन केले.

| गट | सहभागी विदयार्थी |
|---|---|
| इ. १ ली ते ७ वी | १५ |
| इ.८ वी ते १० वी | ०८ |

या स्पर्धेत दोन्ही गटातील प्रथम ,द्वितीय ,तृतीय क्रमांक विदयालयातील विदयार्थ्यांनी पटकावले. शालेय शिक्षणाबरोबरच या विदयार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रवरा ग्रामीण औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय,प्रवरानगर मार्फत केंद्रशासनाच्या स्कीम अंतर्गत लेदरबॅग बनविणे ,हस्तभरतकाम ,मेणबत्ती बनविणे , खडु तयार करणे,मेहंदी,रांगोळी, चित्रकला इ.चे व्यावसायिक प्रशिक्षण कोर्सेस राबविले जातात.

**समारोप**

१९६४ साली स्थापन झालेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे १९८० पासून डॉ.बाळासाहेब विखे पाटील अध्यक्ष होते.या काळात त्यांनी प्रवरा परिसराला एक प्रयोगशाळा मानुन तेथे विविधांगी स्वरुपाचे प्रयोग त्यांनी यशस्वी करुन दाखविले आहेत. शालेय शिक्षण हा विदयार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग मानुन डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शालेय शिक्षणात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून गुणवत्तेला महत्त्व दिले. सर्वसामान्य विदयार्थ्यांबरोबरच दिव्यांग विदयार्थ्यांसाठी शाळा सुरु करुन त्यांनाही विशेष महत्त्व दिले.हे प्रयोग इतर नेत्यांना प्रेरणादायी व शासनाला पथदर्शक ठरले आहेत.उज्ज्वल निकालाची परंपरा व नाविन्यपूर्ण उपक्रमाचे अधिष्ठान लाभलेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत उदयाचा समर्थ भारत -सक्षम भारत येथे घडविला जात आहे.

**संदर्भ**

खंडागळे ,जनार्दन काशिनाथ (२००४).**बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण नेतृत्व : एक अभ्यास** ,पीएच.डी. मराठवाडा विदयापीठ ,औरंगाबाद.

गायकवाड ,राजेश (संपा.) (२००७).***सहकार रत्न मा.खा.बाळासाहेब विखे पाटील गौरवग्रंथ***: लोणी.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था (२०११).**वार्षिक अहवाल ,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था** :२०१०-२०११.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था (२०१५*).**वार्षिक अहवाल ,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था** :*२०१४-२०१५.

विखे पाटील ,बाळासाहेब (२००७).***कोठे राहिला गाव***(अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब (२००४). ***अर्थ - अनर्थ*** (अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब (२००४).***प्रवरेच्या तीरावरुन***(अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब ,(१९९५, ऑगस्ट) I ***शिक्षण आणि ग्रामीण रोजगार*** .लोकसत्ता.